पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर

दिनांक 25/01/2020 (शनिवार)

(दुपार)

---

. जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीस अटक

.

. दिनांक 24/01/2020 रोजी ठाणेदार पो. स्टे. केळवद सपोनि श्री. सुरेश मट्टामी यांना मुखबिराद्वारे खबर मिळाली की, पांढुर्णा ते नागपूर जाणाऱ्या हायवे रोडनी सीजी–04/डीएफ–6128 क्रमांकाच्या ट्रक मध्ये अवैध्यरीत्या कतलीसाठी गौवंशाची वाहतुक केली जात आहे. अशा खबरे वरुन सपोनि श्री. सुरेश मट्टामी हे पो.स्टे. केळवद स्टाफसह पांढुर्णा ते नागपूर जाणाऱ्या हायवे क्र. 47 वरील बिहाडा फाटा येथे नाकाबंदी लावून वाहन तपासात असतांना दिनांक 24/01/2020 चे सकाळी 09:45 वा. दरम्यान एक सीजी–04/डीएफ–6128 क्रमांकाचा ट्रक येतांना दिसला. ट्रक चालकास वाहन थांबविण्याचा ईशारा केला असता चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन न थांबविता सरळ नाकाबंदी करीता उभे असलेले पोलिस अधिकारी व कर्मचारी यांच्या अंगावर ट्रक आणला. पोलिस स्टाफ आजुबाजुने पळाल्याने त्यांचा जिव वाचला. ट्रक सरळ नागपूरच्या दिशेने निघुन गेला. पोलिसांनी सदर ट्रक थांबविण्याचा वारंवार इशारा केला असता तो न थांबल्याने नागपूरच्या दिशेने उड्डानपुलाच्या खालच्या रोडने समोर जाऊन लाहोरी बारच्या विरूद्ध दिशेने समोरील रोडवर नागपूर दिशेने जानारे कंटेनर थांबवुन रोड ब्लॉक केला. सदरचा ट्रक जवळ आल्यानंतर त्याला थांबन्याचा इशारा दिला. परंतु सदर ट्रक न थांबता स्पिड वाढवुन पुन्हा पोलिसांच्या अंगावर आणन्याचा प्रयत्न करून शासकीय कामात अडथळा निर्माण कयन उजव्या बाजुस डिव्हायडरवर ट्रक चढवुन डिव्हायडर पार कयन विरूद्ध दिशेने बेदरकारपणे नागपूरच्या दिशेने पळन्याचा प्रयत्न केला. यातंनर ट्रक काही अंतरावर गेल्यावर अचानकपणे ट्रकचे टायर फाटल्याने व ट्रक बंद पडल्याने ट्रक चालक व त्याच्या सोबत असलेले त्याचे दोन साथिदार असे तिघे झाडीझुडपे व जंगलाचा फायदा घेऊन ट्रक सोडून पळुन गेले. पोलिस स्टाफने ट्रकची पाहणी केली असता सदर ट्रक मध्ये 35 गाई गौरे गौवंश जनावरे अत्यंत क्रुर व निर्दयतेने पाय व तोंड दोरीने बांधुन दिसले. जनावर कि. 3,50,000/–रू. व वाहन किमती 15,00,000/–रुपये असा एकुण कि. 18,50,000/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी नामे– क्र. 1) सुरज परमानंद मेश्राम, वय 20 वर्ष, रा. सेलोटी, तह. लाखणी, जि. भंडारा यास अटक करण्यात आली आहे. आरोपी क्र. 2) भिमराव उर्फ गोलु नेमीचंद मेश्राम, वय 25 वर्ष, रा. सेलोटी, तह. लाखणी, जि. भंडारा, 3) भाईजान रा. एमपी व 4) रशिद, रा. नागपूर हे अटक नाही.

. पोलीस स्टेशन केळवद अप क्र. 11/2020 कलम 353, 279, 34 भादवी सहकलम 11(1)(घ)(ड)(च) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधि. सह कलम 5 (अ) 9 महा. प्राणी सरंक्षण अधिनीयम सहकलम 132/177, 184 मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि श्री पंकज वाघोडे हे करीत अहेत.

. सदरची कार्यवाही ही श्री राकेश ओला, पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा.,मा. श्रीमती मोनीका राऊत, अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रा., श्री अशोक सरबंळकर, उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग

सावनेर यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार सपोनि श्री सुरेश मट्टामी, सपोनि श्री पंकज वाघोडे, सफौ मोरेश्वर नांदेकर, नापोशी राजेन्द्र रेवतकर, प्रमोद भगत, पोशि सचिन येळकर यांनी केली आहे.

.





.

<u>पोलीस माहिती कक्ष</u>

<u>नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर</u>